सत्याग्रही - दिवाळी - २००४

# एक होता गाव

नरेन्द्र चपळगावकर

गाव तसं लहानच होतं. जिल्ह्याचं ठिकाण असले तरी लोकवस्ती फक्त १७- १८ हजाराच्या आसपास. कोणत्याही दिशेला दोन फर्लांग गेले की गावाची हद्द संपायची. गावातच काय पण जवळपासही कोठे रेल्वे नव्हती. गावात खडी दाबून केलेले दोन-तीन मोठे रस्ते होते. गल्ल्यात मात्र पाऊस पडला की चांगलाच चिखल होई. लोकलफंड या नावाचे सरकारी खाते रस्त्याची झाडलोट आणि दिवाबत्तीची व्यवस्था करावयचे. चौकात आणि काही गल्ल्यांच्या तोंडाशी भिंतीवर चौकोनी कंदील लावलेले होते. लोकलफंडचे एक-दोन लोक शिडी घेऊन संध्याकाळी त्या कंदीलात रॉकेल भरीत आणि ते लावीत. गल्लीच्या तोंडाशी एक भिंतीवरच्या ओतीव बीडाच्या पाटीवर उर्दूत गल्लीचे नाव लिहिलेले असे. बहुतेक पाट्या गायब झाल्या होत्या; परंतु गल्ल्यांची नावे सगळ्यांनाच पाठ होती.

गावाच्या मधून बिंदुसुरा नदी वाहत होती. पूर्वी तिला पावसाळ्यात पूरही यायचा. पूर पाहायला आम्ही जायचो. नदीवर असलेल्या खोलगट पुलावरून पाणी जाऊ लागले की गावाच्या दोन्ही भागांचे दळणवळण थांबायचे. नदीला आलेला पूर पाहायला लोक झुंडीने नदीवर जायचे. एखाद-दुसरा त्या पुरात उडी टाकून पोहायचा. त्याच्या या साहसाची आम्हा मुलांच्यात बरेच दिवस चर्चा असे. पूर नसेल तेव्हा नदी पार आकसून जायची. नदी अलीकडच्या गावातल्या गृहिणी घरचे धुणे एखाद्या पाटीत घेऊन नदीवर जायच्या आणि तेथे ते धुवावयाच्या. नदीच्या पश्चिमेकडच्या म्हणजे जुन्या गावात पाणी भरपूर होते. अनेक मोठ्या वाड्यात तर दोन-दोन आड होते. पाच-सहा ठिकाणी सरकारने सार्वजनिक विहिरी बांधल्या होत्या. त्यावरूनही लोकांना पाणी घेता येई. पाण्याची अजिबात टंचाई नव्हती. नदीच्या पूर्वेकडे असलेल्या पेठेत मात्र पाणीच नव्हते. नदीच्या पात्रातली वाळू बाजूला करून ताजा झरा करावयाचा आणि त्यातून लहान भांड्याने पाणी घेऊन कळशा भरावयाच्या असा उद्योग पेठेतल्या सगळ्याच स्त्रियांना करावा लागत असे. पेठेत मारवाडी व्यापारी, तेली, साळी, लोणार आणि काही भागांत श्रमजीवी मंडळी मुख्यतः राहत.

अगदी काटेकोर जातवार विभागणी नसली तरी वेगवेगळ्या जाती गावाच्या वेगवेगळ्या भागात बहुसंख्येने राहत होत्या. जुन्या बाजाराच्या आतल्या भागात ब्राह्मण वस्ती होती तर बाहेरचा भाग मुस्लिमांनी व्यापला होता. अजीजपुरा, पिंजार गल्ली, कारंजा या भागांत मुस्लिम वस्ती होती. धांडे गल्ली, कबाड गल्ली, गिराम गल्ली या भागांत मराठा मंडळी राहवयाची. माळी वेस हा त्या समाजाची वस्ती असलेला भाग होता. शनिवार पेठेत तेली, लोणारपुऱ्यात लोणारी, खडकपुऱ्यात श्रमिक धनगर, मराठा आणि इतर मंडळी राहवयाची. माळी वेशीच्या पलीकडे रस्ता ओलांडला की महार वस्ती होती.

धोंडापुरा ही प्रतिष्ठितांची वस्ती समजली जाई. वकील, सरकारी नोकर अशी मंडळी प्रामुख्याने त्यात राहत. बहुसंख्य ब्राह्मण असले तरी मराठा, मारवाडी वगैरे समाजाची मंडळीही त्यात होती. एका छोट्याशा भागात मुस्लिम बागवानांचीही वस्ती होती. आमचा वाडा बांधला तेव्हा तो याच धोंडापुरात मुख्य चौकात होता. चौकाच्या चार रस्त्यांपैकी एक रस्ता पुढे बंद झाला आणि आता तेथे तीनच रस्ते उरले आहेत. चार रस्त्यांपैकी एक रस्ता देशपांड्यांच्या वाड्याकडे जात होता. त्यांच्या मोठ्या दरवाजातून चौक, पलीकडे अंतरावर असलेली धोंडाजी वेस आणि त्यानंतर नदीचे पात्र असे सगळे दृश्य दिसत असे. वाड्याचे आणि देशपांड्यांचे महत्त्व सांगणारी ही बाब होती. वाड्यात नांदणाऱ्या शाखेच्या कोण्यातरी भावकीला हे सहन झाले नाही. त्याने एक नामी शक्कल लढविली. देशपांड्यांच्या वाड्यातून चौकापर्यंत येणाऱ्या रस्त्यातच त्याने मशीद बांधली आणि रस्ताच बंद करून टाकला. मशीद बांधायला परवानगी लागत नसे. आणि तिने रस्ता अडविला तरीही कोणी तक्रार करू शकत नसे. आजही ती मशीद अंताजीची मशीद म्हणून ओळखली जाते. या मशिदीमुळे आमचा वाडा आता चारऐवजी तीन रस्त्यावर उभा आहे.

गावात वीज, दूरध्वनी वगैरे तर काहीच नव्हते. गावाबाहेर एक आणि पेठेत एक असे दोन टप्पाखाने (टपाल कचेऱ्या) होते. त्यातल्या एकीत तार पाठविण्याची सोय होती. संस्थानातल्या वेगवेगळ्या ठिकाणावरून येणारे टपाल या टप्पाखान्याचे पोस्टमन वितरित करीत. तसे फारसे टपालच येत नसे. वकिलासारखे व्यावसायिक सोडले तर इतरांकडे फक्त खुशालीची पत्रेच येत. तार येणे हा तर भीतीदायक प्रसंग असे. ब्रिटिश हद्दीतून येणारे टपाल मात्र बीडपासून तीन मैलावर असलेल्या

मुर्शदपूर या गावात असलेल्या छोट्याशा पोस्टात येई. संस्थानी मुलखाने वेढलेले हे छोटेसे गाव ब्रिटिश भारतात होते व त्याचा जिल्हा अहमदनगर होता. तेथला एकुलताएक पोस्टमन बीडला हे टपाल घेऊ येई. इतर पोस्टमन उर्दूत बोलत. मुर्शदपूरचा पोस्टमन मात्र मराठीत बोले. दर दिवाळीला नाशिकला असलेल्या मामांकडून मनिऑर्डरने आईला पाच रुपये ओवाळणी येई. ही मनिऑर्डर घेऊन पोस्टमन आला म्हणजे आमच्या ओसरीवर बोलावून त्याला चहा दिला जाई. आमच्यासाठी तो आमच्या माच्या गावाहून आलेला असे.

बीडला तेव्हा दिवसातून फक्त तीन- चार बसेस येत. निजाम स्टेट रेल्वेचा एक बस वाहतूक विभाग होता. तो या बसेस चालवी. वेगळे बसस्थानक नव्हते. राजुरी वेशीच्या बाहेर पोस्टासमोर बसेस थांबत. हैदराबादला जायचे म्हणजे बसने जालन्याला जाऊन तेथून रेल्वे पकडावी लागे. परळीलाही रेल्वे होती. पण परळीला जायला थेट बसच नव्हती. गावात तीन- चार टांगे होते. सामान असले तर त्या टांग्यातून घरी येता येई. सरदारखान नावाच्या एका कंत्राटदाराकडे खासगी मोटार होती; पण ती गावात येत नसे. सायकलसुद्धा फारच क्वचित दिसावयाची.

गावात एक सरकारी हायस्कूल होते. त्याला मदरसे फोकानिया असे म्हणत. दोन- तीन सरकारी प्राथमिक शाळा होत्या. शिवाय चंपावती विद्यालय ही एक खासगी प्राथमिक शाळा काही लोकांनी सुरू केली होती. त्याच शाळेत मी जात होतो. मुलींची सातवीपर्यंतची एक शाळा सरकारने सुरू केली होती. मुली फारशा शिकत नसत. त्यामुळे मुलींना घरापासून शाळेत नेण्यासाठी पडदा लावलेल्या छकड्याची सोय करण्यात आली होती. माझी चुलतबहीण शाळेत जायची. तिला रोज बोलवायला शाळेचा चपराशी वाड्यात येऊन ‘ताईसाहेब, चला’ अशी हाळी द्यावयाचा. घरासमोर थांबलेल्या छकड्यात तिने बसायचे आणि शाळेत जायचे.

संध्याकाळ झाली म्हणजे सगळे गाव शांतपणे झोपी जाई. घरापासून फर्लांगभर असलेल्या पोलिस ठाण्यात तासातासाला टोल वाजविले जात. त्यांचा आवाज रात्री स्पष्ट ऐकू येई. असेच टोल इतर काही सरकारी कार्यालयातही वाजविले जात. रात्री फारच आवश्यक असले तरच लोक घराबाहेर पडत. आमच्या वाड्याच्या मागच्या गल्लीत एक पिठाची गिरणी होती. सकाळी गिरणी सुरू झाली म्हणजे थोड्यावेळ गिरणी चालवणारा वाफ जाणाऱ्या पाईपावर एक मडके पालथे धरून पक, पक असा आवाज करायचा आणि गिरणी सुरू झाल्याचे सगळ्या गावाला कळायचे. गावात हॉटेल नव्हते. होती ती एक तुळजापूरकरांची खाणावळ. त्यात फक्त पोळी- भाजी मिळायची. एकदा आमच्या चुलत्यांच्या दुकानात नकाशे विकणारा एक तेलगू गृहस्थ आला. भाताशिवाय दुसरे काही खाण्याची त्याला सवय नव्हती. बिचारा एक दिवस उपाशी राहिला आणि दुसऱ्या दिवशी सगळा संकोच बाजूला सारून त्याने माझ्या चुलत्यांना भात असेल तर मी तुमच्या घरी जेवायला येतो असे सांगून येऊन जेवला.

अंताजीच्या मशिदीपासून उजव्या हाताला वळले की लगेच एका मुस्लिम कासाराचे घर होते. कासाराची म्हातारी बुबू आणि तिचा मुलगा लग्न कार्यात काचेच्या बांगड्या भरायला येत. त्यानी बांगड्या भरल्या की, बांगड्या भरून घेणारी बाई त्यांना वाकून नमस्कार करी आणि बुबू आणि तिचा मुलगा त्या बाईला चक्क ‘अष्टपुत्र सौभाग्यवतीभव’ असा आशीर्वाद देत. कासाराच्या पलीकडेच एक मोठे रिठ्याचे झाड होते. रिठ्याचा उपयोग केस धुवायला होत असल्यामुळे त्या झाडाखाली चार- दोन मुली हमखास दिसायच्या.

हसेगावकरांचा वाडा सोडला की बाजूलाच प्रभाकर देशपांडे यांच्या वाड्यात चरखा संघ होता. वाड्याच्या एका भागात माझ्या वडलांचे एक मित्र नित्रुडकर राहत. वडीलही कधी त्यांच्याकडे गप्पा मारायला येत. वाड्यातल्या मोठ्या ओसरीवर भिंतीला हारीने चरखे टांगून ठेवलेले असत. काही मुले आणि एक- दोन मुली तेथे चरख्यावर सूत कातणे शिकण्यासाठी येत. समोरच डॉक्टर आठवले राहत. तो वाडा खरे म्हणजे विटकरांचा होता. पण दोघेही विटकर नोकरीनिमित्त परगावीच होते. त्यामुळे वाडा आठवलेंचा वाडा म्हणूनच ओळखला जाई. वाड्याच्या मागची गल्ली मात्र विटकर गल्ली म्हणून सरकारी दप्तरात नोंदलेली होती. खासगी वैद्यकीय व्यावसायिकांपैकी आठवले आणि नातू हे दोनच ॲलोपथीची पदवी घेतलेले होते. एक- दोन आयुर्वेदिक आणि युनानी वैद्य होते. लहानसा सरकारी दवाखानाही होता. किरकोळ आजारासाठी लगेच डॉक्टरकडे धाव घेण्याची प्रथाच नव्हती. विंचवाचा दंश आणि अर्धशिशी अशा विकारावर मांत्रिकावर जास्त विश्वास होता. दोन- तीन लोकांना विंचवाचा मंत्र येत असे. त्यातले एक रात्री बहुधा आपल्या अंगवस्त्राच्या घरी मुक्कामाला असत. एरवी अशा घरी मुले जात नसत. पण विंचू चावला म्हणजे त्यांच्याकडे जाण्याशिवाय गत्यंतर नसे. एका मुस्लिम न्यायाधीशाला अर्धशिशीचा मंत्र येत होता. त्यांच्या घरी सकाळीच जायचे ते बाहेर येत. आपल्याकडे पाहून मंत्र पुटपुटत आणि नंतर एक खिळा अंगणात जमिनीवर ठोकीत. आपली अर्धशिशी जमिनीत गाडली जाई.

तसेच पुढे गेले म्हणजे मारुतीचे देऊळ येई. माळीवेशीच्या या देवळाशी आमचा घराचाही पुष्कळ संबंध होता. देवळात जेथे पंडितबुवा पुराणिक पुराण सांगत ते खण आमच्याच

कोणी पूर्वजांनी बसविले होते. देवळाच्या जवळची एक रिकामी बखळ माझ्या आजोबांनी समस्त ब्रह्मवृंदांच्या उपयोगासाठी विकत घेतली होती. त्यांचे वारस म्हणून माझ्या वडिलांनी तेथे सार्वजनिक उपयोगासाठी काही बांधकाम करावे म्हणून परवानगीचा अर्ज दिला. माझे वडील अस्पृश्यता पाळीत नव्हते. शिवाय केशवराव कांबळ्यांसारख्या काही दलित नेत्यांशी त्यांचे मित्रत्वाचे संबंध होते. काही सनातनी मंडळींनी आक्षेप अर्ज दाखल केला की, पुरुषोत्तमरावांना (माझ्या वडलांना) बांधकामाची परवानगी देऊ नये कारण ते या इमारतीचा उपयोग अस्पृश्यांसाठी करतील. बरेच दिवस परवानगीच मिळाली नाही आणि मिळाली तेव्हा वडील ज्यांच्याकडे वकिली करीत होते त्या चुलत आजोबांनी ती परवानगी आपल्याजवळ ठेवून घेतली आणि तेथे बांधकाम झाले नाही.

मारुतीच्या देवळात दुपारी पुराण सांगितले जाई. लग्नाच्या दिवसात वराचे सीमंत पूजन या देवळातच होई. बऱ्याच वेळा हे सीमांत पूजन रात्री बाराएकला होई. लग्नाच्या वरातीसुद्धा रात्री एक- दोन वाजता निघत. आजूबाजूला पाहण्यासाठी फारसे कुणी जागे नसे. आरामात सगळे चाले आणि बायकांचा कपडे बदलण्यात एवढा वेळ जाई की वरातीला उशीर होई. गाव झोपले असले तरी वरातीतील मंडळी मिरवण्यात खुश असत. गणपतीच्या दिवसात या देवळातही एक- दोन दिवस मेळे होत. त्याकाळी रस्त्यावर रहदारी अडवून मेळे फारसे होत नसत. देवळात जागा कमी असली तरी लोक दाटीवाटीने बसत. मेळ्यात ईश्वराच्या स्तुतीपर गाण्यांच्या बरोबरच एक- दोन गाणी लोकजागृती करणारी असत. मूळ गाण्यात नसलेला काळाचा संदर्भ त्यांना प्राप्त होई. त्यामुळे प्रत्यक्ष शब्दातून जे सांगितलेले नसे तेही लोकांच्या मनात जागे होई.

'तो शूरपणा आता तरुणात कसा नाही?
इतिहास मराठ्यांचा स्मरणात कसा नाही?'

अशा काही ओळी माझ्या आजही स्मरणात आहेत. या संबंध गाण्यात निजामी राजवटीच्या विरुद्ध काही नव्हते. पण तसा अर्थ मात्र ऐकणाऱ्यांच्या मनात जागा होत असे.

माळीवेस म्हणून जो चौक ओळखला जाई तेथे आता वेस नव्हतीच. ती कधी तरी पडून गेली असली पाहिजे. देवळाच्या लगतच एक छोटीशी पोलिस चौकी होती. चौकीत आरोपी मला कधी दिसले नाहीत. पण एकदा मात्र मलाच तेथे जाण्याचा प्रसंग आला. संस्थान राजवटीच्या शेवटच्या दिवसात भारत सरकारने आर्थिक नाकेबंदी केली होती. नेहमीच्या उपयोगाच्या अनेक वस्तू मिळेनात. डिझेल संस्थानात येत नव्हते म्हणून बसेस कोळशावर चालू लागल्या होत्या. बसच्या मागच्या बाजूला पाण्याच्या बंबाच्या आकाराचे कोळशाचे बंब लावले गेले होते. सर्वांनाच अत्यावश्यक असलेले रॉकेल अगदीच दुर्मिळ झाले होते. एकदा थोडेसे रॉकेल चौकीत वितरित होणार आहे असे कळाले. तेथे जाण्यासारखा घरात मीच होतो. सात- आठ वर्षांचा मी होतो. पोलिस चौकीत एका लहान बाटलीत चार आण्याचे रॉकेल लोकांची धक्काबुक्की सहन करीत गर्दीतून मी आणले. तेव्हा मी आजीच्या कौतुकाचा विषय झालो होतो. देवळासमोर रस्त्याच्या मध्यभागी एक छोटासा चबुतरा उभारून त्यावर दिवाबत्ती करण्याची सोय केलेली होती. या चौकातून पुढे सरळ पांदीने गेले म्हणजे ओपळकरांच्या शेतानंतर सटवाई होती. सगळ्या देवळाना छत असले तरी सटवाईचा संसार मात्र उघड्यावर असे. नवीन बाळ जन्माला आले म्हणजे सव्वा महिना झाल्यावर बाळ- बाळंतीण सटवाईच्या दर्शनाला जाई. बाळाला सटवाईचे दर्शन घडविले म्हणजे नंतर दोघे दुसऱ्या एखाद्या देवाच्या दर्शनाला जात आणि मग घरी येऊन बाळंतीण वागायला उठे.

माळीवेशीच्या चौकातून डावीकडे वळले की, जालना रोडला मिळणारी सडक लागे. या सडकेवर काही तुरळक घरे झाली होती. पण शेतेही होती. या रस्त्यावर डावीकडे एक जीनिंग फॅक्टरी आणि ऑईल मिल होती. गावात कारखाना म्हणण्यासारखी ही एकच गोष्ट होती. तिच्या समोरच एक शिंदीखाना होता. संध्याकाळ झाली की तेथे वर्दळ वाढे. या रस्त्यावर एक गोष्ट मात्र सुंदर होती. ती म्हणजे रस्त्याच्या दुतर्फा असलेली उंच वाढलेली बुचाची झाडे. बुचावर चढून फुले काढता येणे अशक्य होते. परंतु रोज झाडाखाली लांब देठांच्या मंद सुंगधाच्या पांढऱ्या बूच फुलांचा सडा पडलेला असे. वेचायला सोपी आणि माळायलाही सोपी. लांब देठ एकमेकांत गुंतवून मुली त्याच्या माळा करीत. बुचाच्या माळेला सुई- दोरा लागत नसे.

माळीवेशीतून उजवीकडे वळले की सरळ नदीपर्यंत जाता येई. अंत्यसंस्कारासाठी याच रस्त्याने जावे लागे. रस्ता संपला की लगेच डावीकडे देशपांड्यांची स्वतंत्र स्मशानभूमी होती. त्यांच्यापैकी अनेक कर्तत्ववान लोकांच्या समाध्या, वृंदावने तेथे होती. त्याच्या बाजूने पुढे गेले म्हणजे सर्वसाधारण स्मशानभूमी होती. सुलतानराव निंबाळकरांनी मक्त्याने बीड जिल्ह्याचा कारभार कधीकाळी केला होता. बहुधा त्यांच्या स्मृत्यर्थ तेथे सुलतानबागही होता. पुढे सगळ्याच देशपांड्यांचा पडता काळ आला. त्यांच्या समाध्या आणि वृंदावनांचे काही दगड निसटले, काही इतरांनी काढून नेले. नदीवर जाणाऱ्या रस्त्यावरही इतकी अतिक्रमणे पुढे झाली की तिरडी नेणेही अवघड झाले.

माळीवेशीच्या चौकातच वझ्यांचा वाडा होता. या

किंवा डोंगऱ्यांच्या वाड्यात लग्नकार्यानंतर होणाऱ्या बोडणासारखे खास कोकणस्थी कार्यक्रम होत. मला हा वाडा दुसऱ्याच कारणासाठी अधिक लक्षात आहे. वझ्यांच्या वाड्यातील एक भाड्याची जागा बीडला असलेल्या न्यायाधीशापैकी एकाला दिलेली असे. फौजदारी अधिकार वापरणाऱ्या अशा न्यायाधीशाकडे आरोपींना हजर केले जात असे. स्वातंत्र्याच्या चळवळीत असलेल्या माझ्या वडलांना (ज्यांना मी काका म्हणे) पोलिसांनी पकडले की ते त्यांना काही वेळ पोलिस ठाण्यात ठेवत व नंतर वझ्यांच्या वाड्यातल्या न्यायाधीशासमोर घेऊन जात. काकांना पकडल्याचे शाळेत कळले तर लगेच मी घरी येई. घरापासून वझ्यांचा वाडा जवळच होता. हातकडी घालून त्यांना पायी चालवीत तेथे आणण्यात येई. मारुतीच्या देवळाजवळ उभे राहिले की, काकांना पोलिस घेऊन जात असताना दिसे. मग मागोमाग वझ्यांच्या वाड्यात जायचे. अंगणामध्ये काका आणि हातकडीची दोरी घेऊन एक पोलिस असे उभे असत. न्यायाधीश माडीवर राहत आणि कागदावर सही करून लगेच तो खाली पाठवित. मग काकांना परत नेण्यात येई. काकांशी बोलता येत नसे आणि तेही दूर दाराजवळ उभे असलेल्या माझ्याकडे सतत पाहत नसत; परंतु एकमेकांची दखल आम्ही घेतलेली असे. दोन- तीन वेळा पाहिलेले वाड्याच्या अंगणात उभ्या असलेल्या हातकडी घातलेल्या काकांचे चित्र माझ्या मनात अद्याप ठसून आहे.

वझ्यांच्या वाड्याचा मुख्य दरवाजा कोतवाल गल्लीत उघडे. कोतवाल आणि मनसबदार या दोन्ही नावाने ओळखले जाणारे कुटुंब एकाकाळी खूप समृद्ध होते. त्यांच्याकडे हत्तीही होता असे आम्ही ऐकत होतो. कोतवाल गल्लीच्या सुरुवातीला जो खूप मोठा आणि उंच दरवाजा होता तो या हत्तीला जाता- येता यावे म्हणून मोठा बांधलेला होता, असे आम्हाला सांगण्यात आले होते. वझ्यांच्या अलीकडे कोतवालांचे वाडे होते. तेथून गल्लीत थोडे पुढे आले की मध्वराम मंदिर लागे. एका जहागिरीत पेशकार म्हणून काम करणाऱ्या आणि चार- दोन गावांच्या मुलखात तहसीलदारचे अधिकार वापरणाऱ्या शेषाचार्यांनी उत्तरायुष्यात वैष्णव पंथाच्या उत्तरादी मठाच्या मध्वाचार्यांचे प्रतिनिधी म्हणून काम करण्यास सुरुवात केली आणि हे राममंदिर बांधले. राम तोच होता; पण त्याला मध्वराम म्हणून ओळखले जाई. गावातल्या साठ- सत्तर वैष्णव ब्राह्मण कुटुंबाची श्रावणीही तेथे होई. मंत्रांच्या उच्चारात नवी यज्ञोपविते लोक धारण करीत. स्मार्थांची श्रावणी वेगळीकडे होई. पुढे हळूहळू श्रावणीला येणाऱ्यांची दोन्हीकडची संख्या कमी कमी होत गेली.

कोतवाल गल्ली संपली आणि धोंडापुराच्या मुख्य रस्त्यावर आले की नंतर सात चौकाचा वाडा लागे. कधी काळी एकाच व्यक्तीच्या मालकीच्या या वाड्याच्या सात चौकात समृद्धी नांदत होती. वाटण्या होत गेल्या आणि वाड्यानेही आपली वाटणी करण्यासाठी आपल्या दगडविटा हळूहळू वेगळ्या करण्यास सुरुवात केली. उरलेल्या भागाचा आधार घेऊन अनेक देशपांडे कुटुंबे आता राहत होती. त्यानंतर बोबडेश्वर गल्ली येई. गल्लीच्या तोंडाशी एक जुना वाडा होता. तो प्रख्यात गणिती भास्कराचार्यांचा वाडा म्हणून ओळखला जाई. तेथून पुढे गेले म्हणजे डावीकडे थिगळे आणि औटी या थोडीशी सावकारी आणि बरीचशी शेती असणाऱ्या समृद्ध ब्राह्मण कुटुंबांचे वाडे होते. रंगपंचमीच्या दिवशी थिगळे किंवा औट्यांची एक बैलगाडी मिरवणुकीने रस्त्यातून फिरे. त्यात एक मोठा पिंप भरून गुलाबी रंग असे आणि जाणारे येणारेच नव्हे तर दुकानदारांच्याही अंगावर तो रंग टाकला जाई. थोडे उजवीकडे वर गेले म्हणजे फरशीवरच्या देशमुखांचे दोन वाडे लागत. वाड्यासमोरच्या उताराच्या रस्त्यावर त्या काळच्या स्थापत्याप्रमाणे दगडी फरशांचा रस्ता केलेला होता. त्यामुळे त्या देशमुखांना फरशीवरचे देशमुख म्हणत. प्रचंड मोठी चौदीवारी पलीकडच्या वाड्याला होती. अलीकडच्या वाड्याला मोठा दरवाजा होता; परंतु वाडा मात्र लहान होता. कधी काळी दोन्ही वाड्यातील कुटुंबे एकच होती. घरात देशमुखी होती. वतन आपल्याला मिळावे म्हणून एक भाऊ मुसलमान झाला. राज्यकर्त्यांनी वतन दिले आणि दोन वेगवेगळ्या धर्मसंस्कृती वेगवेगळ्या भागात नांदू लागल्या. धर्म वेगळे झाले तरी परंपरा आणि नाती पूर्ण तुटली नाहीत. हिंदू देशमुखांकडे लग्न झाले तर नवी नवरा- नवरी मुस्लिम चुलता- चुलतींकडे पाया पडायला जायची आणि मुस्लिम भावाकडे लग्न झाले तर तेथील नवरा- नवरी इकडे यायची. पुढे आर्थिक समृद्धी ओसरत गेली आणि इतिहास फक्त सांभाळावा लागला.

देशमुखांचे वाडे ओलांडले की पाटंगण गल्ली लागायची. जनार्दनस्वामी नावाचे एकनाथकालीन साधू पुरुष जेथे राहत होते ते पाटंगण. नंतर खालचे आणि वरचे अशा किंवा थोरले आणि धाकटे अशा नावाने ओळखली जाणारी दोन पाटंगणे झाली. खालच्या म्हणजे थोरल्या पाटंगणात जनार्दन स्वामींची ध्यानाची जागा आहे. एकनाथ भेटावयला आले असताना बोलण्यात विक्षेप नको म्हणून अंगातला ज्वर ज्या घोंगडीत जनार्दन स्वामींनी थोडावेळ काढून ठेवला ती घोंगडी तेथे आहे. तिची उत्सवात पूजाही होते. श्रावण वद्य षष्ठीपासून अष्टमीपर्यंत तीन दिवस जनार्दन स्वामींच्या पुण्यतिथीचा उत्सव होतो. स्वामींच्या घरात गोसाव्याचे व्रत. ते अद्याप चालू होते. दोन्ही पाटंगणांचे अधिपती आपल्या शिष्य परिवारासह भिक्षा मागण्यासाठी गावात फिरत. काही वेळा कोरडी भिक्षा मागितली

जाई. परंतु एक दिवस निवडक घरांमध्ये निरोप येई आणि शिजवलेले अन्न भिक्षा म्हणून त्या दिवशी घेतले जाई. आमच्याही वाड्यात ही भिक्षा मागण्यासाठी येत.

पाटंगण गल्लीच्या उजवीकडे गेले म्हणजे छापखाना गल्ली येई. शंभर वर्षांपूर्वी एक वर्तमानपत्र बीडला निघे आणि ते या गल्लीत छापले जाई म्हणून छापखाना गल्ली. छापखाना गल्लीतून चोरगल्लीत येता येई. आजूबाजूच्या मालकांनी अगदीच थोडी जागा रस्त्यासाठी सोडल्यामुळे गल्लीचे नाव चोरगल्ली झाले होते. गल्लीच्या अरुंदपणामुळे अनेक आख्यायिका जन्माला आल्या होत्या. एकदा एक व्यापारी घोड्यावर पडशीत बराच माल टाकून चोरगल्लीतून जात होता. त्याच्या घोड्यावर टाकलेल्या पडशा चोरगल्लीच्या बाजूच्या दोन्ही भिंतींना अडकून अधांतरी राहिल्या. वर झोपलेला व्यापारी पडशावर राहिला आणि खालचे घोडे मात्र निघून गेले अशीही एक गोष्ट लहानपणी आमचे रंजन करीत असे.

घरापासून फर्लांगभर अंतरावरच माझी शाळा होती. एक जुना वाडा आणि रस्त्यापलीकडची एक दुमजली इमारत अशा दोन भागांत शाळा विभागली होती. घरापासून शाळेला जाताना कान्होपंताच्या हवेलीच्या बाजूच्या गल्लीतून जावे लागे. शाळेला जाताना दोन अडथळे होते. या गल्लीला काटकोन करणाऱ्या देशपांडे गल्लीच्या तोंडाशी एक लिंब होता. या लिंबावर एका मुंजाचे भूत होते असा समज होता. रात्री कधी या लिंबाखालून जाण्याचा प्रसंग आला तर जीव मुठीत धरून जावे लागे. दिवसा भूत काही करत नाही हे माहीत असले तरी नाही म्हटले तरी थोडी भीती वाटायची. पुढे ती गेली. दुसरा अडथळा म्हणजे जवळच राहणारा आमचा एक वर्गमित्र. या दांडगट मित्राच्या खोड्या सतत चाललेल्या असत. गल्लीत चिखल व्हायचा आणि पाणीही साचायचे. बाजूने शाळेतले कोणी चालले की त्याच्या अंगावर चिखल उडेल अशा बेताने डबक्यात तो दगड टाकीत असे. दुसऱ्याला त्रास देण्यात त्याला विलक्षण आनंद होई. त्याला चुकवून शाळेला जावे लागे. चौथीनंतर ही शाळा सुटली आणि सरकारी शाळेत पाचवीला जावे लागले.

राजुरीवेशीच्या बाहेर पडले की उजव्या हाताला फोकानियाची इमारत होती. एवढ्या एकच शाळेला भले मोठे ग्राऊंड होते. शाळेच्या फाटकाच्या बाहेर कुंपणालगत दत्तू आणि दिगंबर हे दोन भाऊ चहा विकीत. रस्त्यावरच दगड मांडून तयार होणारा त्यांचा चहा लोकप्रिय असे. पलीकडचे न्यायालय, सरकारी कचेऱ्या यातले वकील, कर्मचारी, शाळेतले शिक्षक व त्यांना चुकवून काही विद्यार्थी दोन आण्यात मिळणारा भरपूर दुधाचा चहा पिण्यास तेथे येत. याच रस्त्यावर गाव संपले की, बालेपीर होता. बाळासाहेब नावाचा कोणी एका मुस्लिम स्त्रीबरोबर राहू लागला. दोन्ही धर्मांचे आचार थोडेथोडे पाळू लागला. तो मेल्यावर त्याचा अंत्यविधी करण्यास हिंदू तयार झाले नाहीत. मुस्लिमांनी त्याचा अंत्यविधी केला आणि तो मृत्यूनंतर जागृत पीर झाला.

शाळेच्या इमारतीसमोरच जिल्हा कारागृह होते. कारागृहाची इमारत रस्त्यापासून थोडीशी आत होती. राजुरी रस्त्यावरून आत कारागृहाकडे वळताना कोपऱ्यावरच एक छोटा पूल होता. त्या पुलावर बीडचे फौजदार अहमद बख्श कधी कधी बसलेले दिसत. त्यावेळच्या संस्थानी कायद्याप्रमाणे चौदा दिवसापर्यंत जास्तीत जास्त एखाद्या व्यक्तीस गुन्ह्याचा आरोप न करताना तुरुंगात ठेवता येत असे. चौदा दिवस झाले की, तुरुंगातून त्या कार्यकर्त्याची रीतसर सुटका करण्यात येई. रजिस्टरमध्ये योग्य नोंदी झाल्यावर तो कार्यकर्ता तुरुंगाबाहेर येई व चालत चालत तो त्या पुलापर्यंत आला म्हणजे अहमद बख्श त्याला पुन्हा अटक करून पोलिस ठाण्यात घेऊन जात.तेथे आवश्यक ते सोपस्कार पूर्ण करून दुसऱ्या दिवशी ती व्यक्ती पुन: तुरुंगात दाखल होई. असेच दर चौदा- चौदा दिवसांनी होत राही. एकदा अशीच चौदा दिवसानंतर रामचंद्रराव, डॉ. भोळे, वैद्य कसरेकर वगैरे पाच- सहा जणांची सुटका झाली. त्यावेळी नेमका जोरात पाऊस चालू होता. अवजड शरीर असलेल्या अहमदबख्शला पुलापर्यंत यायला उशीर झाला. स्वागताला फौजदार नाही हे पाहून ते सर्वजण निसटले. बहुतेक जण संस्थानाबाहेर पोहोचले.

एक मारके मुस्लिम शिक्षक आम्हाला उर्दू शिकवत. त्यांचा एक हात अर्धाच होता. आपापसात त्यांना आम्ही तुंडे मास्तर म्हणत असू. बहुतेक क्रमिक पुस्तकांवर सातवे निजाम मीर उस्मान अली यांचे चित्र छापलेले असे. उस्मान अलींना मिशा होत्याच. त्या मिशांना वळसे देणे किंवा त्यांना दाढी चिकटवणे असे उद्योग माझ्या शेजारी बसणारा मोरेश्वर करीत असे. एकदा त्याने माझ्याही पुस्तकावर अशी सुधारणावादी चित्रकला रेखीत केली. नेमके तेच पुस्तक तुंड्या मास्तरांनी पाहिले आणि त्यांनी मला पाच- दहा थपडांचा प्रसाद दिला आणि हा प्रकार आपण त्या गावचेच नाही असा अभिनय करीत मोरेश्वर पाहत होता. युसूफ नावाच्या एका चपराश्याचा मुलगा आमच्या वर्गात होता. तो प्रचंड गुंडगिरी करी. कारण नसताना भांडणे तर करीच शिवाय थोडेही निमित्त काढून तो मारामाऱ्याही करी. काळ असा होता की त्याच्याविरुद्ध संख्येने जास्त असूनही इतर मुले काही करू शकत नसत. पोलिस कारवाई झाली आणि त्यानंतर जेव्हा शाळा सुरू झाली तेव्हा पहिल्या दिवशी आमच्या सर्व वर्गाने त्या मुलाला धुऊन काढले. तो इतका घाबरला की दुसऱ्या दिवशी त्याचे वडील त्याच्याबरोबर आले व त्यांनी सर्व वर्गाची त्याच्या पूर्वीच्या

वर्तनाबद्दल माफी मागितली. काळ बदलल्यामुळे निवळलेला तो मुलगा आमच्याशी नंतर चांगला वागू लागला.

शाळेतले माझे आवडते शिक्षक म्हणजे ड्राईंगचे गुळवेलकर आणि क्रॉफ्टचे लक्ष्मीकांतराव दस्तकारी. मी 'विद्यार्थी' नावाचे एक हस्तलिखित मासिक काढायचो त्याची मुखपृष्ठे गुळवेलकर सर रंगवीत. अतिशय मृदू बोलणारे हे सर आमच्या अभ्यासेतर उपक्रमात अधिक रस घेत. लक्ष्मीकांतराव यांचे तर आडनावच दस्तकारी झाले होते. लाकडाच्या वस्तू कशा करायच्या आणि पुस्तकांचे बाईंडिंग कसे करायचे ते शिकवीत. वर्गात शिकण्यापेक्षा त्यांच्या घरी असलेल्या छोट्याशा वर्कशॉपमध्ये एकटेच जाऊन शिकणे अधिक चांगले असे.

शाळेतले आम्ही दोन- चार मित्र कधीमधी गावाबाहेर डबे घेऊन सहलीला जाण्याचा विचार करत असू. राजूरी वेशीच्या पुढे नगर रस्त्यावर सुमारे मैलभर अंतरावरच एक रणखांब होता. कोण्यातरी युद्धाच्या स्मृतीसाठी उभारलेला तो खांब हे आमच्यासाठी सहलीचे ठिकाणच होते. पेठेच्या पलीकडे मन्सुरशाह वली आणि शहेनशाह वली असे दोन दर्गे होते. मन्सुरशाह हे महादजी शिंद्यांचे गुरू. ग्वाल्हेरच्या शिंदे सरकाराकडून या दर्ग्याच्या व्यवस्थापनासाठी अनुदान मिळे. दर्ग्याच्या बाहेर झाडीही होती. तेथेही आम्ही कधी जात असू. आमचे सर्वात आवडते ठिकाण म्हणजे खंडेश्वरी. दसऱ्याच्या दिवशी सीमोल्लंघनाला जाण्याचे बहुतेकांचे ठिकाण म्हणजे खंडेश्वरी. हे देऊळही गावाच्या मानाने उंचावरच होते. परंतु त्याच्याहीपेक्षा उंच एका छोट्या टेकडीवर खंडोबाचे देऊळ होते. मूळची बांधकामाची ठेवण तशीच कायम राखलेला एक सभामंडप आणि दोन दीपमाळी असलेले हे देऊळ अगदी दुरूनसुद्धा दिसे. आजूबाजूला वस्ती नाही, वर्दळ नाही टेकडीवर एकटेच उभे असलेले देऊळ आणि भोवताली घोंगावणारा वारा हे आमचे आवडते ठिकाण होते. खंडोबा आणि खंडेश्वरी एकमेकांसमोर थोड्या अंतरावर उभे होते. खंडेश्वरीच्या खूप अलीकडे गावातच कंकालेश्वराचे मंदिर होते. देवळाच्या मुख्य भागाच्या आजूबाजूला पाणी होते व एक दगडी पूल देवळात जाण्यासाठी केला होता. पण हे सर्व आम्ही फार नंतर पाहिले. पोलिस कारवाई होण्यापूर्वी आम्हाला त्या देवळात जात येत नसे. त्या देवळावर नासिरुद्दीन पंचहत्यारी नावाच्या इसमाने ताबाच केला होता. या देवळात हिंदुंना दर्शनासाठी जाऊ दिले पाहिजे यासाठी थेट हैदराबादपर्यंत प्रकरण गेले आणि फक्त एका ब्राह्मणाने पूजा करावी. यात्रा मात्र तेथे भरू देऊ नये असा आदेश आला होता. माझ्या वडलांना एकट्याला मात्र पोलिस तेथे जाऊ देत.

गावाचा सगळ्यात मोठा उत्सव म्हणजे मुक्ताबाईची पालखी. विदर्भातल्या एदलाबादहून येणारी ही पालखी दरवर्षी अगदी न चुकता श्रावण वद्य एकादशीला संध्याकाळी गावात प्रवेश करी. माळीवेशीच्या मारुतीच्या मंदिरात तिचा मुक्काम असे. पालखी येण्याच्या अगोदर एक- दोन दिवस लोकांची तयारी सुरू होई. पानफुलाची दुकाने रस्ताभर लागत. पानफूल म्हणजे पाने जास्त आणि फुले एखाददुसरेच. गावात फारशी फुलेच नव्हती. पानफुलाच्या पुडीत असायची ती मुख्यत: गुलमोहराची फुले. मारुतीच्या देवळाच्या मागे असलेल्या बखळीत काटेकोरांटीची चारदोन झाडे आणि गुलबक्षीची काही झाडे होती. दत्त मंदिरात चाफ्याची दोन झाडे होती. गंगाराम माळ्याच्या शेतात थोडीफार जाई- जुईची, चांदणीची फुले असत. अहमद फुलाऱ्याच्या शेतात गुलाब होते. थोडीशी वेचलेली बुचाची फुले बस एवढीच. पालखीच्या दिवशी गावातली फुले कुठून पुरी पडणार? संध्याकाळी गेले म्हणजे पालखीचे निवांत दर्शन होई. पण मिरवणुकीतले दर्शन खरे. दुसऱ्या दिवशी म्हणजे द्वादशीला सकाळी नऊ- दहा वाजता पालखी पुढच्या मुक्कामाकडे निघे. माळीवेशीपासून बलभीम चौकापर्यंत सगळा मुख्य रस्ता माणसांनी फुलून जाई. पालखीच्या पुढे बरोबर दिंडीत आलेले वारकरी असत. त्याच्यापुढे दोन- तीन मलखांब बैलगाड्यावर असत. गावातल्या तालमीतले तरुण मलखांब खेळत. चार- पाच गट लेझीम खेळत. कुणी काठी फिरवी. त्याच्याही पुढे गावातले बँडवाले आणि वाजंत्री असत. बँडचा व्यवसाय पूर्णवेळ करण्याइतके काम नव्हते. हिंदू न्हावी आणि मुस्लिम पिंजारी आपापला व्यवसाय सांभाळून हा जोडधंदा करीत. त्या दोघांचे दोन बँड होते. पालखीच्या समोर वाजवण्याचे दोघेही पैसे घेत नसत. ती मानाची सेवा असे. शिवाय बँडवाल्यांचे व्यवसाय वर्ष पालखीपासून सुरू होई. त्या वर्षात त्या बँडमध्ये असणार, त्यांचा पगार काय असेल हे ठरे. पालखी आमच्या वाड्याच्या समोर आली म्हणजे वाड्यामागच्या गल्लीतून पालखीची खणानारळाने ओटी भरण्यासाठी काकी आणि आई जायच्या. गावात दोन्ही कानांनी ठार बहिरा असलेला एक शिडशिडीत उंच मुसलमान होता. त्याला बहिरा पत्रेवाला म्हणूनच ओळखले जाई. पालखीच्या अगोदर चार- आठ दिवस खपून तो भिरभिरे करी व पालखीच्या मिरवणुकीत विके. दिवाळीला तो सुंदर आकाशदिवे करायचा. इतरवेळी रॉकेल डब्यातून काढावयाचे पत्र्याचे पंप, नरसाळे अशा वस्तू करावयाचा. डब्यात कोणाला परगावी काही न्यावयाचे असेल तर तो ते सांडू नये म्हणून डबा झाळून देई. पालखीचे दर्शन घ्यायचे आणि तिच्याबरोबर गावाच्या वेशीपर्यंत जायचे. मुक्ताबाईची पालखी गावात आली म्हणजे त्यादिवशी थोडा तरी पाऊस हमखास पडे. पालखीच्या उत्सवाचा ती पावसाची सर हा एक भागच असे. एखाद्या वर्षी क्वचित पाऊस आलाच नाही तर फारच चुकल्याचुकल्यासारखे होई.

मुक्ताबाईला निरोप दिला म्हणजे लोक घरोघर परतायचे.

गणपतीचा दहा दिवसांचा उत्सव हा तेवढ्या गर्दीचा नव्हता. सार्वजनिक गणपती एक- दोन ठिकाणीच बसायचे. दत्त मंदिरात बसणारा गणपती हा मानाचा होता. गावातली काही उत्साही मंडळी गणपतीच्या दिवसात करण्यासाठी काही मेळे बसवत. अशा मेळ्यांची एक स्पर्धाही काशीरावाच्या धर्मशाळेत होई. गणपती समोर अगदी साधी सजावट असे. अनंत चतुर्दशीच्या दिवशी निघणाऱ्या विसर्जनाच्या मिरवणुकीत मात्र लोकांची खूप गर्दी होई. आपापल्या घरचे गणपती डोक्यावर घेऊन अनेक लोक त्यात सामील होत. जुन्या बाजारातून वेशीतून खाली उतरायचे आणि नदीत गणपीतचे विसर्जन करायचे. याही मिरवणुकीत मलखांब, लेझीम असत. गणपतीची मिरवणूक मशिदीसमोर आली की वाद्ये थांबवावी लागत. शिवाय काही तंट्याचा प्रसंग उदभवू नये म्हणून मिरवणुकीतील मुखंडांना काळजी घ्यावी लागे. पुढे आम्ही काही मुलांनी दत्त मंदिरात मुलाच्या स्पर्धा, छोटी नाटके, जादुचे प्रयोग असे उपक्रम करण्याला सुरुवात केली आणि ते लोकांना खूप आवडले. अलीकडच्या काळात असे कार्यक्रम होईनासे झाले आणि फक्त सजावट आणि ध्वनीवर्धकांचा आवाज यांनाच महत्त्व राहिले. निजामी राजवट संपवणारी पोलिस कारवाई झाली ती बीडला नेमकी अनंत चतुर्दशीच्याच दिवशी. त्यामुळे त्यादिवशी विसर्जनाची मिरवणूक निघाली नाही. ती दुसऱ्या दिवशी सकाळी अपूर्व उत्साहात निघाली.

गणेश चतुर्थीच्या दिवशी वाड्यासमोरचा आसाराम सोनार त्याने घरी बनवलेला गणपती आमच्याकडे आणून देई. टोपल्यात ठेवलेल्या एका छोट्या पाटावर ठेवलेला गणपती घरी आणला की आम्ही तो देवाजवळ ठेवावयाचा आणि त्याच्या टोपलीत गहू भरून द्यायचे. गणपती आम्हाला देणे हा त्याचा आणि त्याने दिलेला गणपती आपण बसवायचा हा आमचा मान असे. त्याला आर्थिक व्यवहाराची बाजू नव्हती. पुढे गावात पेणचे सुबक रंगीत गणपती येऊ लागले. तसा गणपती आपल्या घरी आणावा असे वाटायचे. त्या छापाच्या गणपतींच्या मानाने आसारामचा गणपती ओबडधोबड असे. परंतु आसारामचा गणपतीच आपल्या घरी आपण बसवायचा असे काका सांगत आणि तीच प्रथा आम्ही गावाबाहेर बंगल्यावर रहायला जाईपर्यंत चालू होती.

दर गुरुवारी दोन- तीन ठिकाणी सार्वजनिक गुरुवार केला जाई. संध्याकाळी आठ- नऊ वाजता २५- ३० लोक जमायचे. त्यात काही गाणारेही असत. पेटी आणि तबलाही असे. पंचपदी म्हणून दत्ताची आरती केली जाई. नंतर जमले तर कुणाचे गाणे नाही तर पत्त्या- सोंगट्याचा खेळ अगर नुसत्याच गप्पा असे होई आणि अकरा बारा वाजता लोक घरोघर परतत. शुक्रवारी संस्थानात साप्ताहिक सुटी असल्यामुळे गुरुवारचे थोडेसे जागरण गैरसोयीचे नसे. गुरुवार तीन- चार ठिकाणी होत असले तरी पंचपदी मात्र तीच असे. बीडलाच राहणाऱ्या कुण्या श्रीपादशास्त्र्यांनी लिहिलेली ही गाणी होती. ती बहुतेकांना पाठ झालेली होती. 'तांबूल हा तुजला, दयाळा!' अशी काही पदाची धृपदे मला अजून आठवतात. दासोबा मांडे यांच्या घरी पौरोहित्याबरोबरच शास्त्रीय संगीताची उपासनाही चालायची. त्यांच्या घरचा किंवा ते जेथे जाणार असतील तो गुरुवार रंजक असे. क्वचित सदाशींवराव बाब्रसासारखे शास्त्रीय संगीत गाणारे गायकही गुरुवारच्या बैठकीत येत. मग पंचपदीनंतर त्यांचे एकट्याचेच गाणे होई. प्लेगच्या दिवसांत गाव शेतात वस्ती करून रहायला गेले म्हणजे अशा कॅम्पवरसुद्धा गुरुवार होत आणि या गुरुवारातून अनेक नव्या गायकांची हौसही भागे आणि लोकांचे मनोरंजनही होई. लक्ष्मीकांतराव हेडक्वॉर्टर या नावाने ओळखले जाणारे एक पोलिस प्रॉसिक्युटर काही भावगीते म्हणत. 'कोणता मानू चंद्रमा?' असली काही गाणी त्यांची फार आवडती होती. कळवातणीचा बाबा म्हणून ओळखले जाणारे बाबासाहेब, गोपाळराव काळे मास्तर, विष्णूपंत धुतेकर असे काही बीडचे गायक रेडिओ दकनच्या औरंगाबाद केंद्रावर गात असत. परंतु गुरुवारच्या बैठकीत ते क्वचितच यायचे. लक्षात राहिलेले एक गायक म्हणजे सखारामपंत निर्मळ. लग्नाच्या प्रसंगी खड्या आवाजात एक मंगलाष्टक ऐकू येई आणि निर्मळ मास्तर लग्नाला आल्याचे सर्वांना कळे.

गावात एक सिनेमा थिएटरही होते. सरदारखान या गावातल्या एकमेव नवश्रीमंत गृहस्थाच्या मालकीचे हे 'रॉयल टॉकीज' अधूनमधून मराठी सिनेमाही दाखवी. एकच प्रोजेक्टर असल्यामुळे सिनेमात पाच- सहा मध्यंतरे होत. मी फारसे सिनेमाला जात नव्हतो. मात्र गावात होणारी सिनेमाची जाहिरात मला फार आवडे. दोन मोठे कापडी बोर्ड एकमेकांना तिरपे टेकवून त्यांना खाली चाके लावलेली असत. त्यावर चित्रपटाचे पोस्टर्स चिकटवलेले असत व थोडा मजकूर रंगवलेला असे. एक माणूस तो ढकलगाडा ढकलत जाई. त्याच्या पुढे दोन- तीनच वाद्यांचा बँड असे. बिगूलाच्या आकाराचे एक छोटे ट्रंपेट वाजवणारा एक हसतमुख मुसलमान अधूनमधून सिनेमाच्या नावाची व त्याच्या विशेषणाची घोषणा करी. 'देखो दिल खेचनेवाला नया तुफान. आज रात मे रॉयल टॉकीजमे देखिये 'हंटरवाली' असले काही तरी तो बोले. त्याच्या मागून जाहिरातीचा ढकलगाडा येई. बँडचा आवाज दुपारी येऊ लागला की मी खडू घेऊन वाड्याच्या दाराशी येई. जहिरातीवरची मराठी आणि इंग्रजी अक्षरे पाहून ताबडतोब त्याची नक्कल वाड्याच्या मोठ्या दारावर करून ठेवी. बाहेरच्या दारावरच्या

अक्षरांची पुन्हा नक्कल आतल्या दरवाज्यावर मी करी. नंतर कुणाला तरी मी ती अक्षरे कोणती ते विचारी व लक्षात ठेवी. मला देवनागरी व इंग्रजी दोन्ही अक्षरांची ओळख याच पद्धतीने झाली. शाळेत इंग्रजी मूळाक्षरे शिकण्यापूर्वी ती मला येत होती. मोठा दरवाजा व त्याच्या आतले देवडीतले लाकडी पार्टीशन या माझ्या पाट्या होत्या. नव्या अक्षरांची ओळख व्हावी म्हणून मी सिनेमाच्या वाजत मिरवत येणाऱ्या पाटीची वाट पहात असे.

एकदा रामराज्य सिनेमा लागला होता. आमचे उपाध्याय वामनाचार्य दोन्ही डोळ्यांनी आंधळे होते तेही हा सिनेमा पाहायला गेले होते. संवाद ऐकू येत होते. पण फारसे समजत नव्हते आणि पडद्यावर काय चालले आहे हे त्यांच्याबरोबर आलेला त्यांचा मुलगा त्यांना सांगत होता. 'आता कोण कोण दिसता आहेत रे 'असे त्यांचे प्रश्न आणि मुलाने दिलेली उत्तरे हे इतर प्रेक्षकांना प्रत्यक्ष सिनेमातल्या संवादासारखीच ऐकू येत होती.

वाड्याच्या एका कोपऱ्यात आम्ही राहत असलेला भाग म्हणजे अंधारे स्वयंपाकघर आणि समोर सहा खणांची ओसरी एवढाच खाली व त्याच्यावर एक माडी असा होता. घरात फर्निचर वगैरे काहीच नव्हते. वाड्यात खेळायला माझा एक चुलतभाऊ सोडला तर माझ्या वयाच्या कोणीच नव्हते. तसा मला खेळण्याचा नादही नव्हता. काका पुस्तके मात्र वाचायला आणत आणि त्यातले एखादे पुस्तक माडीवर एकटेच जाऊन मी वाचत बसे. राहुल सांकृत्यायन यांचे 'व्होल्गा ते गंगा' हे माझ्या लक्षात राहिलेले आवडलेले पहिले पुस्तक. पुष्कळवेळा संदर्भ नीट लक्षात येत नसत. तरी हातात येईल ते पुस्तक मी वाचून टाकत असे. आमची माडी ही पुस्तक वाचण्यासाठी आदर्श जागा होती. तेथे कोणीही अडथळा करण्यासाठी येत नसे.

माडीच्या आतल्या खोलीत एक खूप मोठी लाकडी पेटी होती त्यावेळी माझ्या छातीपेक्षाही उंच असलेल्या वजनदार आणि लांबरुंद अशा त्या पेटीत माझ्या मनाला मोह घालणारे भांडारच होते. अगदी लहानपणी मला शिवलेला जरीची एक शेरवानी, त्यावर घालायची जरीची घडीची टोपी त्यात होती. ही टोपी मी कधी घातल्याचे आठवत नाही. पण ती मला फार आवडत असे. टोपीवर जरीच्या कलाबतुत श्रीकृष्णाचा छापील फोटो शिवलेला असे. या पेटीतच एक दस्तार होती. दस्तार म्हणजे संस्थानातील प्रतिष्ठितांनी घालवयाची एक पगडी. निजामसुद्धा दस्तारच घालत असे. फक्त त्यावर एक तुरा आणि मोत्याची माळ असे. इतरांच्या दस्तारीवर तुरा नसे. त्यातच माझ्या आजोबांनी वापरलेला एक फटकाही होता. इतरही काही कपडे होते.

पेटीत आणखीही काही अजब चिजा होत्या. हैदराबाद संस्थानच्या सर्व निजामांची चित्रे एक पट्टीवर वेगवेगळ्या तुकड्यात छापून त्याच्या सात घड्या करून एका छोट्याशा पत्र्याच्या पेटीत ठेवल्या होत्या. निजामाच्या राज्यरोहणाचा रौप्यमहोत्सव झाला त्यावेळी अशा डब्या वाटण्यात आल्या होत्या. पेटीत एक बिल्लाही मला एकदा सापडला. हिंदू महासभेचा तो बिल्ला होता. काकांना मी विचारल्यावर त्यांनी सांगितले की, काँग्रेसची चळवळ सुरू होण्यापूर्वी पुण्यात झालेल्या हिंदू महासभेच्या अधिवेशनाला ते आणि त्यांचे काही मित्र गेले होते त्यावेळचा तो आहे. आमच्या कुटुंबाच्या भूतकाळाच्या अशा अनेक खुणा त्या पेटीत जपलेल्या होत्या. ती पेटी आणि त्यातल्या वस्तू आज कुठे आहेत हे मला माहीत नाही.

आमच्या उजवीकडे आमचे एक चुलत चुलते आबा आणि डावीकडे दुसरे चुलत चुलते बळवंतराव दादा राहत. त्यांच्या बैठकीच्या वर असलेल्या माडीचा फारसा वापर नव्हता. पण बार्शीचे जावई आले म्हणजे त्यांची व्यवस्था तेथे होई. माडीवर एक छपरी पलंग होता आणि उरलेल्या भागात जाजम अंथरुन स्वच्छ बैठक करण्यात येई. भावजी तेथे असत. मुलांनी शक्यतो तेथे सारखे जाऊन त्यांना त्रास देऊ नये असे काकी सांगत. जावयांच्या स्वागतासाठी विशेष पदार्थ म्हणजे शेवयाची दूध फेणी. बीडला न मिळणारा व बाहेरून आणावा लागणार असा तो पदार्थ होता. क्वचित मुलांनाही त्याचा नुमना मिळे. बळवंतराव दादांचे जावई जहागिरदार होते. ते दिवसा बराच वेळ झोपत आणि रात्री एक- दोन वाजता त्यांना भूक लागे. वर माडीत त्यांचा मुक्काम असे आणि सासुबाईंना वेगवेगळ्या खाद्यपदार्थांची फर्मायश होई रात्री एक वाजता भज्यांचा घाणा निघे. जेवताना पानात टाकणे हे आवश्यक आहे असेही त्यांना वाटे.

ख्वाजा नावाच्या एका वकिलाची आबांची खूप मैत्री होती. ख्वाजा वकिलाच्या मुलीचे लग्न झाले तेव्हा गावातल्या हिंदू प्रतिष्ठितांसाठी वेगळे जेवण आमच्या वाड्यात आबाकडे झाले. जेवण सर्व ब्राह्मण स्वयंपाकी करीत होते. ख्वाजा वकील फक्त एकदा वाड्यात येऊन सर्वांना सावकाश जेवा अशी विनंती करून गेले. लग्नकार्य त्या काळी वाड्यातच होत. मंगल कार्यालये नव्हती. लग्नात रोषणाई, मंडप वगैरे खर्च करण्याची प्रथा नव्हती. ब्राह्मण किंवा मराठा प्रतिष्ठितांची साधारण सुस्थिती असली तरी असला खर्च करण्याची ऐपत आणि पद्धत दोन्हीही नव्हती. वाड्याच्या अंगणात एका पांढऱ्या कपड्यावर कावेने स्वस्तिक रेखून तो कपडा चारी बाजूने बांधून अंगणात वर लावला जाई तेवढाच मंडप. फार झाले तर एखादे जाजम छत म्हणून लावत. पत्रिकांची चैन

नंतर सुरू झाली. निमंत्रणे तोंडी जात. गावातल्या लोकांना अक्षत, परगावच्यांना पत्रे. पत्रिका घरातील कोणाच्याही नावची असली तरी घरातल्या सर्वांनीच लग्न किंवा मौंज लावायला जायचे अशी पद्धत होती. समारंभाचे निमंत्रण आणि जेवणाचे निमंत्रण या वेगळ्या गोष्टी असत. त्यामुळे नुसते शुभकार्याला जाण्यास संकोच वाटत नसे. जेवणाचे निमंत्रण सांगणारे काही ब्राह्मण असत. ते त्यांच्याजवळच्या यादीप्रमाणे प्रत्येक घरी जाऊन 'अमक्या अमक्याच्या घरी लग्नानिमित्त दुपारी भोजन, तुमच्या घरातील एका माणसाला आमंत्रण' असे मोकळेपणाने सांगत. जेवायला जायचे म्हणजे पाणी पिण्यासाठी फुलपात्र घेऊन जावे लागे. बहुतके जेवणे पत्रावळीवर व्हायची. कुणाजवळच शे-दोनशे भांड्यांचा सेट नसावयाचा. जाणाऱ्याने बोलवणाराची अडचण लक्षात घेण्याची प्रथा होती. लग्नकार्यात सगळे जवळचे नातेवाइक विशेषत: स्त्रिया झटून काम करीत. बाहेरचे केटरर्स आणण्याची प्रथा नव्हती. काही श्रीमंत घरात लग्नकार्याला लागणारी भांडी होती. ती परिचितांना विनामूल्य मिळत. एखाद- दुसरा आचारी असे. परंतु वाढण्याचे काम घरच्या अनुभवी स्त्रियाच करीत. ज्याच्याकडे मनुष्यबळ कमी आहे त्याला मदत करणारे काही तरुण नंतर पुढे आले.

अंत्ययात्रेत भाग घेणे हे अशुभ आहे असा गैरसमज होता. त्यामुळे अंत्यविधीसाठी आवश्यक तेवढी माणसे जमा होणे कित्येकवेळा कठीण जाई. पुरुषोत्तमराव गोडसे , गणपतराव पत्की, तहसीलमधले गावरस्कर, माझे वडील वगैरे काही मित्रांनी थोड्याही परिचिताच्या अंत्यविधीला आवर्जून जायचे अशी प्रथा सुरू केली. त्यामुळे इतरांची भीती कमी झाली. प्रारंभी ज्यांनी खांदा दिला त्यांनीच शेवटपर्यंत खांदा द्यायचा, खांदेकरी बदलायचे नाहीत शिवाय पायात चप्पल घालायची नाही असे काही त्रासदायक नियम काही पोटजातीत होते. तेही पुढे शिथील झाले. पण सुरुवातीला मात्र नातेवाईक लांब रहायचे आणि याच लोकांना अंत्यविधीत पुढाकार घ्यावा लागायचा. आता हे सगळे बदलले. मृत्यू ही एक अपरिहार्य गोष्ट आहे. ती स्वाभाविकपणे स्वीकारली पाहिजे आणि आवश्यक त्या गोष्टी केल्या पाहिजेत. त्यात अशुभ किंवा भीतीदायक काही नाही हे आता मान्य झाले आहे.

माझे चुलत चुलते बळवंतराव दादा मला अंधुक अंधुक आठवतात. एका मेजाजवळ बसून ते काही तरी लिहित असायचे. ते मला आठवतात तेव्हा ते कोर्टात फारसे जात नसावेत. त्या आणखी आठवतात म्हणजे अंगणातल्या त्यांच्या भागात एक दगडी फरशी होती. त्याची दरजबंदी अधूनमधून उखडायची. दादांना बांधकामाचा नाद होता. करणी, टोपले अशा वस्तू नेहमी असायच्या. स्वत: हाताने करणी घेऊन दरजबंदी दुरुस्त करीत असलेले दादा मला आठवतात. त्यांच्या शेवटच्या दुखण्यात प्रकृती गंभीर झाली तेव्हा सगळा वाडा जागा होता. सकाळी मी जागा झालो तेव्हा काकीच्या रडण्याचा आवाज येत होता. ओसरीवर मी झोपलो होतो तेथून बाहेर जाऊन पाहण्याची माझी इच्छा होती; पण मला आई अंगणात जाऊ द्यायला तयार नव्हती. हट्टाने खिडकीतून थोडेसे पाहिले ते मात्र वेदना देणारे होते. आमच्याकडे शिकायला असलेले शेषेकाका नावाचे वडलांचे मावसभाऊ काकीच्या हातातल्या बांगड्या फोडत होते.

पुढे दादांचा हिस्सा आम्ही विकत घेतला आणि काकी मुलीकडे राहायला गेल्या. आम्हाला राहायला जरा पैस झाला. पत्र्याची एक मोठी माडी आता मला उपलब्ध झाली. तेथल्या भिंतीतल्या दोन लहान कपाटात दहावी- वीस पुस्तकांचे ग्रंथालय चालवणे, सुताच्या दोऱ्याने दोन पत्र्याच्या डब्यांना जोडून ध्वनिक्षेपकाचा आभास निर्माण करणे, चार मित्र समोर बसवून एका छोट्याशा व्यासपीठावरून भाषण देणे असे माझे आवडते खेळ करायला माडीची जागा सोयीची होती.

गावात तेव्हा एक- दोनच रेडिओ होते. काका औरंगाबादच्या हर्सूल तुरुंगात स्थानबद्ध होते. संस्थानाची परिस्थिती तणावाची होती. भारत सरकार कधी हस्तक्षेप करणार याची सर्वांनाच आणि आम्हाला तर जास्त उत्सुकता होती. बुंदलेपुऱ्यात राहणाऱ्या हनुमानसिंगाच्या मुलांपैकी एकाकडे रेडिओ होता. रोज रात्री बाबा (माझे चुलते) आणि त्यांचे एक मित्र ऑल इंडिया रेडिओवरच्या बातम्या ऐकायला जात. त्यांच्याबरोबर कधी आमच्या वाड्याजवळ राहणारे आबा बाभ्रस वगैरे असत. मीही बाबांच्या बरोबर जाण्याचा हट्ट धरी तेव्हा ते मलाही घेऊन जात. बातम्या ऐकायच्या आणि घरी परत यायचे. घरी आजी आणि आई वाटच पाहत असायच्या. ऐकलेल्या बातम्यावरून काका कधी सुटणार याचा अंदाज बांधायचा. एकदा गंमत झाली उर्दू बातम्यांत 'जहागिरदारी निजाम खतम करनेका फैसला किया गया है' असे आले. घरी आल्याबरोबर आबा बाभ्रसांनी आजीला अर्थ सांगितला की निजामाला खतम करण्याचा निर्णय झाला आहे. वस्तुत: उर्दूत निजाम म्हणजे व्यवस्था. जहागिरदारी व्यवस्था नष्ट करण्याचा सरकारने निर्णय घेतला आहे एवढीच ती बातमी होती. आबा बाभ्रसांच्या मनातली आशा मात्र उगीचच पल्लवीत झाली होती.

मामा जास्त आजारी आहेत, त्यांना भेटून जा. असा निरोप आल्यानंतर आजी, आई, बाबा (माझे चुलते) आणि मी. असे नाशिकला निघालो. जाताना औरंगाबादमध्ये मुक्काम केला आणि आजी, आई आणि बाबा काकांना तुरुंगात भेटून आले. नाशिकला मी चार महिने होतो. परत आलो तेव्हा गावातले वातावरण आणखी वेगळे दिसले. वाड्याजवळच्या

मशिदीसमोर एकेदिवशी रात्री सभा झाली. एक दाढीवाला गृहस्थ खूप काही जोराजोरात बोलला. अनिसुद्दिन वकिलांचे एक तलवार घेऊन झालेले भाषण ऐकायला बाबा मला घेऊन गेले होते. काही लोकांच्या हातात लहान आकाराच्या पण अधिक गोळ्या झाडणाऱ्या बंदुकाही दिसू लागल्या. शाळेतून मी परत येईपर्यंत आईला जास्त काळजी वाटू लागली. संस्थानातल्या वरंगल आणि गुलबर्गा या तुरुंगात गुंडांना प्रवेश देऊन सत्याग्रहींना मारहाण झाली. औरंगाबादच्या तुरुंगात असे काही घडणार तर नाही अशी शंका येऊ लागली. संध्याकाळी घरी लवकर परता असे वाड्यातल्या सर्वांनाच सांगण्यात आले. मोठा दरवाजा संध्याकाळीच बंद होऊ लागला. दरवाज्यामागची आगळ नीट लावली की नाही याची बाबा दोन- तीन वेळा तपासणी करू लागले. एरवी शांत झोपणारे गाव अस्वस्थपणे जागे राहू लागले.

न्या. नरेन्द्र चपळगावकर
१३, जयनगर,
औरंगाबाद.

संपादकांना सूचना :

एक मशिदीचे व जवळच्या झाडाचे रेखाचित्र पाठवले आहे. मूळ मशीद आता प्रचंड मोठी झाली आहे. त्यामुळे आताच्या फोटोचा उपयोग नाही. मला जमेल तसे रेखाचित्र काढले आहे. ते चित्रकाराकडून नीट करू घ्यावे.

खंडोबाच्या देवळाचे एक छायाचित्र पाठविले आहे. त्यावरून रेखाचित्र करून घ्यावे.

लेखाची पोच शक्यतो दूरध्वनीवरून द्यावी.

आपला,

(नरेन्द्र चपळगावकर)

१९ सप्टेंबर २००४